**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**
**बांधकाम विभाग**

**<u>प्रस्तावना</u> :-**

**विषय :- वॉर्ड क्रं.३ रामनगर पाण्याची टाकी पासुन डंपिंग ग्राउंड कडे जाणा-या रस्त्याचे कॉक्रीटकरण करणे.**

उपरोक्त विषयांकीत कामो मा. बिकास एस. निकम माजी सभागृह नेता तथा माजी नगरसेवक, प्रभाग क्र.३ यांचे पत्राच्या अनुषंगाने वॉर्ड क्रं. ३ रामनगर पाण्याची टाकी पासून डंपिग ग्राउंड कडे जाणा-या रस्त्याचे कॉक्रीटकरण बाबत मागणी केली होती. प्रभाग समिती क्रं.१ कार्यक्षेत्रातील रामनगर पाण्याची टाकी पासून पूढे डंपिंग ग्राउंड कडे जाणा-या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असुन सदर रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. सदरच्या रस्त्यावरुन कचरा डंपिंग करणेकरीता डम्पर तसेच घंटागाड्या व इतर खाजगी गाडयांची नियमित वर्दळ सुरु असते. पावसाळयात पावसामुळे रस्त्यावरील खडयांचा अंदाज न आल्याने वाहनचालकांना गैरसोईस सामोरे जावे लागते. डंपिंग ग्राउंड कडे जाणारा रस्ता हा चढणीचा रस्ता असुन गाडया स्लिप होवून या अगोदर सुध्दा अपघात झालेले आहेत. त्यामुळे परिसरातील पदाधिकारी, प्रतिष्ठीत नागरिकांच्या नियमित तक्रारी येत होत्या. सदरचा रस्ता यापुर्वी डांबरीकरणाने दुरुस्ती करण्यात आला होता, मात्र वाहतुक मोठ्या प्रमाणात व पावसामुळे रस्ता नादुरुस्त झाला असल्यामुळे विषयांकीत ठिकाणी सी.सी. रस्ता तयार करणे अत्यंत आवश्यक होते. मा. आयुक्त यांनी विषयांकीत रस्त्याची पहाणी केली व त्यानुसार मा. शहर अभियंता यांना सी.सी. रस्त्याचे प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने विषयांकीत रस्त्याचे रक्कम रु.१,१०,२२,६९५/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी दहा लाख बावीस हजार सहाशे पंच्यानवद मात्र) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले व सदर खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.११/०२/२०२२ रोजी मंजुरी दिली आहे. विषयांकीत कामाचे कार्यादेश संस्थेस निर्गमित करण्यात आले असुन सध्या काम पुर्णत्वाकडे आहे. तरी सदरचा प्रस्ताव कार्योत्तर प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** 632 **दिनांक :-**30/09 **/२०२५**

वॉर्ड क्रं.३ रामनगर पाण्याची टाकी पासुन डंपिंग ग्राउंड कडे जाणा-या रस्त्याचे कॉक्रीटकरण करणे याकामी रक्कम रु.१,१०,२२,६९५/- (अक्षरी रक्कम रु. एक कोटी दहा लाख बावीस हजार सहाशे पंच्यानवद मात्र) खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रक्कम रक्कम रु.१.,१०,२२,६९५/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी दहा लाख बावीस हजार सहाशे पंच्यानवद मात्र) खर्चाच्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**